Ex/ICD/2019-20/955
dt. 17/09/19

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र — ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई— ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./ ९५५ /२०१९ दिनांक :— १७ सप्टेंबर, २०१९

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचलित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन, महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि: संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक/संचालक यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, द्वितीय सत्र २०१९ च्या परीक्षा दि. ०१ ऑक्टोबर २०१९ पासून सुरू होत असून साधारण OSM प्रणाली मार्फत उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन करण्याचे काम दि. ०५ ऑक्टोबर २०१९ पासून सुरू करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, अजून ब—याच महाविद्यालयांनी OSM CAP सुरू केलेली नाही तसेच विद्यापीठाच्या असे हि निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयातील काही प्राध्यापकांनी संगणकाधारित प्रणाली मध्ये नाव नोंदणी केलेली नाही. त्यामुळे ब—याच अभ्यासक्रमाचे निकाल महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ८९ अन्वये वेळेत घोषित करता येत नाहीत.

OSM प्रणाली यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्था/महाविद्यालयांचे लक्ष पुढील सुचनेकडे वेधण्यात येत आहे.

१ विद्यापीठ परिपत्रक क्र. १६४८—अ /दि. २७ मार्च २०१८ नुसार प्रत्येक महाविद्यालयाला CAP सुरू करणे बंधनकारक आहे.

२. CAP सुरू करण्यासाठी ७५०६८३९५९३ नंबरवर संपर्क साधावा.

३. महाविद्यालयातील प्रत्येक शिक्षकांनी संगणकाधारित प्रणाली मध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. (परिपत्रक क्रमांक ९६० /२०१९ दि. २८ सप्टेंबर २०१८ नुसार बंधनकारक आहे)

४. महाविद्यालयाने त्यांच्या विद्यार्थी संख्येच्या १.५ पट उत्तरपुस्तिका तपासणे बंधनकारक आहे. (कृपया परिपत्रक क्र. ४७७/२०१९/दिनांक २६ फेब्रुवारी २०१९) (उदा १०० विद्यार्थी संख्या, ५ विषय, ५०० उत्तरपुस्तिका म्हणजेच १.५ टक्के प्रमाणे ७५० उत्तरपुस्तिका तपासणे बंधनकारक आहे) .

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.




५. प्रथम सत्र २०१८ व त्यापूर्वी पुरविण्यात आलेल्या उत्तरपुस्तिका कृपया द्वितीय सत्र ऑक्टोबर २०१९ साठी वापरू नयेत द्वितीय सत्र ऑक्टोबर २०१९ साठी नवीन उत्रपुस्तिका पुरविण्यात येतील.

६. मराठी व इंग्रजी भाषेत लिहिलेल्या उत्तरपुस्तिका वेगळया गठ्ठयात बांधून विद्यापीठात पाठविण्यात याव्यात.

७. L.D. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकेच्या पानांवर L.D. चा शिक्का मारावा व Attendance sheet वर सुध्दा L.D. चा उल्लेख करावा.

८. कॉपी केस बाबत ज्युनिअर सुपरवायझर व सिनियर सुपरवायझरनी स्पष्ट मत मांडून विद्यापीठात पाठवताना स्वतंत्र पाकिटात पाठविणे आणि Attendance sheet देखील वेगळी पाठवावी.

९. द्वितीय सत्र २०१९ पासून परीक्षा केंद्रावरील विद्यार्थ्यांची Attendance online पद्धतीने पाठवायची असून त्यासाठी Link- http://uom.examtrac.in आहे. तसेच या परीक्षेपासून Supervisior आणि Attendance Report एकत्रित केले असून नवीन Supervisior cum - Attendance Report परीक्षेपूर्वी महाविद्यालयांना उपलब्ध करून देण्यात येतील.

१०. OSM प्रणालीत शिक्षकांनी नाव नोंदणी करताना स्वतःच्या महाविद्यलयाच्या ऐवजी CAP सेंटरच्या महाविद्यालयाचे नाव लिहिले आहे. तसेच Bank Details देखील चुकली आहे. त्यामुळे सदर दुरूस्ती करण्याचे अधिकार फक्त शिक्षकांना असल्यामुळे सर्व शिक्षकांना विनंती करण्यात येते की, स्वतःच्या महाविद्यालयाचे नाव व Bank Details update करावी.

११. CAP सेंटर सकाळी ७.३० ते रात्री ९.०० पर्यंत सुरू ठेवावे.

डॉ. विनोद पाटील.
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Kamal pc/D/All draft & letters Marthi letter